# जगण्यातील निखारे



उषा खंदारे

# अनुक्रम


❖ जगण्यातील निखारे ९
❖ कुणी घर देता का घर १०
❖ वाट ११
❖ खेळ झाला छोटा १२
❖ विरोधाभास १४
❖ ती कोलमडत नाही १५
❖ तणाव १६
❖ वजाबाकी १८
❖ नात्यांचे चेहरेमोहरे १९
❖ नवी विश्वाती २१
❖ विषाणू २२
❖ शब्द २३
❖ अस्तित्व २५
❖ प्रश्नांच्या जंगलात २६
❖ हिशोब २८
❖ कोण वाचवणार या देशाला? २९
❖ कृतज्ञता ३१
❖ प्रेमाचे क्षण ३२
❖ स्नेहाचा अनुबंध ३३
❖ जगणं ३४
❖ हिंसेची रूपं ३५
❖ ऑफिसमधील कोल्हे ३७
❖ दबलेला आवाज ३८
❖ तात्कालिक नात्याचा गुंता ३९
❖ प्रलयंकारी विळख्यात ४०
❖ बाईची जागा ४१
❖ प्रश्नचिन्ह ४२
❖ जगण्याचे आराखडे ४४
❖ सूड ४५
❖ जीवनाचा परिघ ४६
❖ मिळेल का हक्क मला? ४७
❖ असाही पाऊस ४९
❖ गर्भातील मनाचं वादळ ५०
❖ विषवल्ली ५३
❖ देशील का मला? ५४
❖ असंच काही ५५
❖ मन ५६
❖ दगड ५७
❖ संकुचित बांधिलकी ५८
❖ रेशीमबंध ५९
❖ आतला आवाज ६०
❖ मानवी मनोरा ६२
❖ अंधारातील किंकाळी ६४
❖ पुरात हरवली माणुसकी ६६
❖ पोरका ६७
❖ अविश्वास ६८
❖ मरणानं केली सुटका ६९
❖ दहशतवादाची पायवाट ७०
❖ पझेसिव्ह ७१
❖ दुःखविराम ७२
❖ स्वार्थी ध्यास ७३
❖ मुंबई मेरी जान ७४
❖ मुक्ती कशी मिळवायची? ७५
❖ आठवणीतलं घर ७६
❖ केवळ बाई आहे म्हणून? ७७
❖ दोन ध्रुवावर दोघे ७८
❖ वैशाख वणवा ८०
❖ जाहिरात ८१
❖ स्त्री ८३
❖ वाह ताज! ८४
❖ संचित ८६

## मनोगत .....

'जगण्यातील निखारे' हा काव्यसंग्रह आपल्या हाती देताना एक वेगळा आनंद मी अनुभवते आहे.

काव्याला विषयाचं बंधन नसतं तरीपण स्त्री जाणिवा आणि त्यांचे प्रश्न, त्यांच्यावर होत असलेला अन्याय, त्यांची अगतिकता कुठंतरी मनाला पोखरत असते. स्त्री कितीही शिकली सवरली तरी तिच्या मागच्या विवंचना संपत नाहीत. तिची जबाबदारी आजच्या काळातही अधिक वाढली आहे. तिच्या कष्टाची जाणीव घरच्यांनी घ्यायला हवी एवढी मात्र अपेक्षा असते. पण ती पूर्ण होते का? तिचंही कुणीतरी कदरदान असावं असं वाटतं.

घरची आघाडी स्त्रियांनी सांभाळायची आणि पुरूषांनी अर्थार्जन करायचं अशी कामाची विभागणी पूर्वीपासून होती. सत्ता आणि अधिकार पुरूषांकडे असायचा पण आता परिस्थिती पालटत आहे. स्त्रिया घराबाहेर पडून नोकरी करू लागल्या आहेत. त्याचबरोबर घरच्या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी उत्तमपणे पार पाडायला हव्यात ही अपेक्षाही घरच्यांची असते. म्हणूनच त्यांना दोन्ही आघाड्यांवर समतोल साधावा लागतो.

नोकरी / व्यवसाय करून पैसा मिळवणं हे नेहमीचं पुरूषाचं ध्येय राहिलं आहे. खरंतर ही हजारो वर्षांची परंपरा आहे. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ लागल्या, त्याला एखादे शतक पूर्ण झाले असेल. पुरूषप्रधान संस्कृतीच्या काळात हा काळ म्हणजे अल्पच. समाजात वर्षानुवर्षे जी मूल्यं रूजलेली आहेत ती एका रात्रीत बदलतील. असं वाटत नाही. त्यासाठी काही काळ तर निश्चितच जावा लागेल. स्त्री आणि पुरूष जेव्हा समान पातळीवर येऊन काम करू लागतील तेव्हाच खऱ्या अर्थानं समानता आनंददायी होऊ शकेल.

मुलीला जन्म देणं हे नकोसं वाटणाऱ्यांची संख्या वाढते आहे. त्यामध्ये शिक्षित वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या सुस्थित वर्गाचा पुढाकार दिसतो. अनेक क्षेत्रात मुली स्वतःला सिद्ध करू लागल्या आहेत. भारतीय स्त्रियांना पक्षपातापासून संरक्षण देणारे जितके कायदे आहेत तितके जगात कुठेही नसतील तरीही शिक्षण, आरोग्य, रोजगार, वेतन, कामाचे तास या सर्वच बाबतीत पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना

भेदभावाला सामोरे जावे लागते. त्यांच्यावरील अन्याय, लैंगिक छळ कमी झालेला नाही. एका बाजूला स्त्रियांची प्रगती होत असताना सर्व प्रकारच्या हिंसाचाराचे लक्ष्यही त्या अधिक प्रमाणात ठरू लागल्या आहेत. पतीची आत्महत्या ही जिवंतपणी तिचीच हत्या ठरते आहे. तिचा मालकी हक्क डावलण्यात येऊन तिलाच उपासमार घडते. समाजात अशा नित्य घटना पहायला मिळतात.

सुशिक्षित स्त्री घराबाहेर पडून नोकरी करू लागली. मोबाईलचं युग अवतरलं. गरज म्हणून सद्य परिस्थितीत प्रत्येकाकडे तो असतोच. पत्नीच्या मोबाईलमधील कॉन्टॅक्ट लिस्ट पती पाहतो. किती फोन आले आणि केले. त्यातून मग त्याबद्दलची विचारणाही ओघानं आलीच. सहज म्हणून कदाचित असेल पण त्याला मात्र हे जाणून घ्यायचं असतं. कुठंतरी त्याच्या मनात संशयाचं वातावरण आणि अस्थैर्याची भावना असते. स्त्री मात्र अशा गोष्टी करताना दिसत नाही. घरची कामं तिच्यापुढे वाट पहात असतात. पतीचा मोबाईल त्यातील नंबर हे पहायला तिच्याकडे वेळ कुठे असतो? किंबहुना अशा गोष्टी तिच्या दृष्टिकोनातून फारशा महत्त्वाच्या नसतात. जग कितीही पुढे जाऊ दे, कोणाला पुरोगामीच्या कितीही गप्पा मारू दे. खरंच स्त्री स्वतंत्र आहे का? हा प्रश्न आहेच. या सुविधेमुळे सुरवातीस वादावादी नंतर भावनिक दरी निर्माण होते असे चित्र सध्या दिसते. स्त्री आपल्या मालकीची आहे. हा मालकी हक्क आजच्या काळातही चांगलाच जोपासला जातोय!

आजच्या धकाधकीच्या जीवनात नात्याची समीकरणंच बदलत चालली आहेत. जीवनाचा वाढता वेग, करिअरचा ध्यास, त्यामुळे येणारे ताणतणाव, जो तो घाईत, बोलायला वेळ नाही, माणूस यंत्रवत झाला. एकवेळ तो आर्थिक मदत करेल पण वेळ देऊ शकणार नाही. परस्परांतील हे नात कुठंतरी हरवत चाललयं.

आजच्या जीवनशैलीत व्यक्तिगत आशाआकांक्षांचा परिघ जरी रूंदावत असला तरी आजूबाजूला कोणतीच भावनिक नाती नसल्यामुळं भावनिक कोंडमाराही वाढतोय. नात्यात असो वा संवादात एक प्रकारची कृत्रिमता जाणवते. त्यातील जिव्हाळा आणि ओलावा कुठंतरी लुप्त झाला आहे. नात्यांची जपणूक कमी झाली. मग ते नातं पती-पत्नीचं असो वा आई-मुलाचं! बदलत्या काळानुसार माणसाचं एकाकीपणही वाढलं. नात्यांतील भावनिकतेची खोली अधिकाधिक संकुचित होत गेली. भावनिक आधार कोणाकडे शोधायचा हाच मोठा प्रश्न आहे.

व्यवसायातील यश, काम, सामाजिक प्रतिष्ठा या सगळ्यापेक्षा कुटुंबाबरोबरचं सहजीवन तितकचं महत्त्वाचं असतं. हेच आपण विसरत चाललो आहोत. सुखासीन आयुष्याची अभिलाषा, भौतिक सुविधा, मनासारखा पैशाचा विनियोग या सर्व खटाटोपात कौटुंबिक नातेसंबंधातील ओलावा सुकून जात आहे याची खंत कुठेतरी जाणवते.

पती-पत्नीमधील वाढत चाललेलं घटस्फोटाचं प्रमाण त्यामुळं मुलांवर होत असलेले परिणाम, त्यांच्या मनातील पोरकेपणाची भावना कुणी लक्षात घेताना दिसत नाही.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. त्यांच्या कुटुंबाची होणारी वाताहात, त्या स्त्रियांवर लादलं गेलेलं 'गावदासीपण' हे कशाचं द्योतक आहे? स्त्रियांवरील होत असलेल्या अन्यायाची आकडेवारी पाहिली की हृदयात कालवाकालव होते. त्यांनी यातून मुक्ती कशी मिळवायची?

वाढत असलेला एडस्‌चा प्रसार, समाजाला पोखरणारी अंधश्रद्धा, देहविक्री करणाऱ्या स्त्रिया, त्यांची मुलं, कुपोषण या समाजापुढे गंभीर समस्या आहेत. दोघेही कमावते झाले. घरातील प्रत्येकास स्वत:ची 'स्पेस' हवी. वडीलधारी माणसं अडगळीची वाटू लागली. आता तर काय! 'लिव्ह इन रिलेशनशिप' म्हणजे कोणाला कसलंच बंधन नको.

गर्भातील बाळाला व्यंग आहे म्हणून जन्माला घालायचं की नाही यावर समाजात उठलेलं वादळ, विविध सणांना आलेलं बाजारी स्वरूप, पैशांच्या मोहानं त्यांना पडलेला विळखा, पुरासारख्या नैसर्गिक आपत्तीतही हरवलेली माणुसकी या गोष्टी मनाला विषण्ण करतात. हेच आपलं संचित का? येणाऱ्या पिढीस आपण काय देणार?

नवीन प्रतिमा व नवे संकेत यांच्या वापरानं कविता वेगळाच आनंद देत असते. या काव्यसंग्रहामुळे आनंदाचा हा अनुभव घेता आला.

२६ नोव्हेंबर ०८ रोजी झालेला मुंबईवर हल्ला आणि ती सुन्न करणारी काळरात्र आठवली की अजूनही भीतीचा थरकाप उडतो. ज्वालांनी घेरलेला ताजमहाल पाहिला नि क्षणभर वाटलं की स्वत:चं घरचं जळतयं. अशा तेजोमय वास्तु या देशाचं वैभव असतात म्हणूनच जास्त दु:ख वाटतं.

अशा हल्ल्यांमध्ये सामान्य माणसं होरपळून निघतात. ती सहजपणे कवडीमोलानं बळी ठरतात. तरीही मनात कुठेतरी आशेचा दीप तेवत असतो उद्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी!

'स्पंदन मनाचे' आणि 'आत्मशोध' या काव्यसंग्रहाचा मला चांगला अभिप्राय अनेक रसिकांनी दिला. त्यामुळेच मला अधिक प्रेरणा मिळाली. याही काव्यसंग्रहाचं रसिक स्वागत करतील अशी आशा आहे.

आपण जीवनात कुणाला ना कुणाला तरी आदर्श मानत असतो. अशा व्यक्ती आपल्या जीवनातील प्रेरणास्थानं असतात. माझ्या जीवनातील प्रेरणास्थानं म्हणजे डॉ. एन.डी. पाटील आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सरोज पाटील. त्यांच्याकडून मला सतत काही ना काही चांगलं शिकायला मिळालं आहे.

डॉ. महेश केळुसकर यांनी अतिशय सुंदर अभिप्राय या काव्यसंग्रहासाठी लिहून दिला. त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. श्री. प्रमोद शिंदे - अध्यक्ष, श्री. विजय केदारे-सचिव आणि सर्व कर्मचारी टाऊन लायब्ररी, वाशी, नवी मुंबई यांचे सहकार्य मिळत असते. या सर्वांचे मनापासून आभार.

प्रा. संतोष राणे यांचे सहकार्य नेहमीच लाभते आहे. त्यांचा अभिप्राय तर फारच मोलाचा असतो. हा काव्यसंग्रह मेहनतीनं आणि तत्परतेनं तयार करून दिला. त्यांचे मनापासून आभार. श्री.महेंद्र गुडेकर यांनी या काव्यसंग्रहासाठी अतिशय सुंदर मुखपृष्ठ तयार करून दिले त्यांचेही आभार.

***- उषा खंदारे***



डॉ. उषा खंदारे,

'स्पंदन मनाचे' आणि 'आत्मशोध' या आपल्या दोन काव्यसंग्रहांनंतर उषा खंदारे यांनी 'जगण्यातील निखारे' या आपल्या काव्यसंग्रहात एका नव्या आत्मविश्वासानं 'मानवी हक्का'ची भूमिका घेतलेली आहे. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान देणाऱ्या पुरूषांच्या नव्या नव्या युक्त्या उघड करून तथाकथित कुटुंबव्यवस्थेचा दंभस्फोट करताना, त्यांच्या काव्यप्रतिमा तीक्ष्ण होतात. आजची आधुनिक स्त्री स्वतःची 'स्पेस' स्वतः निर्माण करून जगापुढे एक 'सक्षम व्यक्ती' म्हणून आपली ओळख करून देते आहे. आणि अशा वेळी दुःख अंगावर घेऊन जगण्याची ताकद स्वतःला देते आहे. आधुनिक स्त्रीच्या आत्मशोधाच्या या कविता आहेत.

महात्मा जोतीराव फुले, ताराबाई शिंदे, गोपाळराव आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी विद्रोहींनी केलेली स्त्रीप्रश्नांची मांडणी पाहता न्यायाची भूमिका, जातीच्या राजकारणातील स्त्रीचे स्थान आणि मानवी हितसंबंधांच्या राजकारणाची समज ही त्रिसूत्री महत्त्वाची ठरते. १९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरं झाल्यानंतर स्त्री प्रश्नांची नव्यानं मांडणी करण्यात आली. त्यामुळं विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांनी स्त्री प्रश्नांवर परस्परांना जोडून घेण्यासाठी एक 'नेटवर्कींग' तयार केलं. आजच्या जागतिकीकरणाच्या नव्या वसाहतवादाला सामोरं जातांना पुन्हा एकदा एक नवी रणनीती तयार करण्याचं आव्हान समस्त स्त्रियांसमोर उभं आहे.

उषा खंदारे यांच्या कविता, हे आव्हान पेलण्यासाठी आपला छोटासा खारीचा वाटा उचलायला सज्ज आहेत. पतीच्या मैत्रिणीकडे पत्नी निर्मळ मनानं पाहू शकते, पण पत्नीचा मित्र पतीला चालत नाही, पेपरमधील विवाहाच्या जाहिरातींमधील पुरुषांच्या अपेक्षा वाढत चालल्यात, आर्थिक कर्ज वाढल्यावर पती आत्महत्या करून मोकळा होतो आणि पत्नीवर सगळ्या कुटुंबाची जबाबदारी पडते - ही कवयित्रीची निरीक्षणे अस्वस्थ करणारी आहेत. आजच्या स्त्रीनं संघर्ष आणि नवनिर्माण यासाठी आयुष्य पणाला लावलंय, असा उद्घोष त्यांची कविता करते.

-- डॉ. महेश केळुसकर

शारदा प्रकाशन

ISBN No. : 81-89272-00-4